लोकसत्ता
नाशिक वृत्तान्त
६ शुक्रवार, १० ऑक्टोबर २०२५ WWW.LOKSATTA.COM

भाजप पदाधिकाऱ्याचा एक पुतण्या फरार, दुसऱ्याला कोठडी

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : जुन्या वादातून अजय बागूल टोळीने तिघांवर प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पाच संशयितांना पोलिसांनी पाच संशयितांना ताब्यात घेतले आहे. यामध्ये भाजपचे ज्येष्ठ नेते सुनील बागूल यांचा पुतण्या गौरव बागूल याचा समावेश आहे. सुनील बागूल यांचा दुसरा पुतण्या अजय फरार आहे. २८ सप्टेंबर रोजी विसे मळा येथे सचिन साळुंके. मित्र सचिन सांगळे, ऋषीकेश जाधव असे तिघे जण खासगी मोटारीतून गोदावरीचा पूर बघण्यास गेले होते. सांगळे वाहन चालवत होता. रामवाडी येथे आले असता जुन्या घराची आठवण झाल्याने थांबले. येथे तुकाराम चोथवे, अजय बोरिसा उभे होते. जुने वाद असल्याने पुन्हा वाद नको म्हणून साळुंके, सांगळे, जाधव पुढे निघाले. विसे चौकात रात्री थांबले असता अजय बोरिसा सहकाऱ्यांसह त्या ठिकाणी आला. बोरिसाने तिघांवर गोळ्या झाडल्या. सांगळे भीतीपोटी मोटार घेऊन पळून गेला. संशयितांनी इतर दोघांना मोटारीत बसवून रामवाडीत नेऊन मारहाण केली.

या प्रकरणात भाजप नेते सुनील बागूल यांचा पुतण्या गौरव बागूल संदिप शेळके, प्रेमकुमार काळे, विकी काळे यांना अटक करण्यात आली. त्यांना न्यायालयात हजर केले असता २३ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली. तुकाराम चोथवे, अजय बागूल, बाबु गोवर्धने, गोपाल दायमा फरार आहेत.

गुन्हेगारीमुळे राजकीय पदाधिकारी गोत्यात

लोंढे पिता-पुत्रासह गौरव बागूल यांना पोलीस कोठडी

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : शहरातील वाढत्या गुन्हेगारीला पायबंद घालण्यासाठी शहर पोलीस सरसावले असून एकाच दिवशी दोन बड्या राजकीय पदाधिकाऱ्यांशी संबंधित तीन जणांना अटक करण्यात आली. त्यापैकी रिपाइंचा ज्येष्ठ नगरसेवक प्रकाश लोंढे आणि त्यांचा मुलगा दीपक लोंढे तसेच भाजपचे ज्येष्ठ पदाधिकारी सुनील बागूल यांचा पुतण्या गौरव बागूल यास पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

सातपूर येथील हॉटेल ऑरो येथे रविवारी झालेल्या गोळीबारात एक ग्राहक जखमी झाला. या प्रकरणात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) नाशिकचा पदाधिकारी तथा माजी नगरसेवक प्रकाश लोंढे यांचा मुलगा भूषण लोंढे आणि त्याच्या टोळीचा सहभाग उघडकीस झाला. सातपूर पोलिसांनी तीन जणांना ताब्यात घेतले. प्रकाश लोंढे, त्यांचा मुलगा दीपक लोंढे यासह तीन जणांना सहआरोपी करण्यात आले. या प्रकरणात आतापर्यंत सात जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून भूषण लोंढे फरार आहे. लोंढे टोळी संबंधित हॉटेल चालकाकडून खंडणी वसूल करीत होती.

या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या लोंढे पिता-पुत्रासह टोळीतील तीन जणांना गुरुवारी न्यायालयात हजर करण्यात आले असता पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. गोळीबार प्रकरणात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) नाशिकचे पदाधिकारी तथा माजी नगरसेवक प्रकाश लोंढे यांचा मुलगा भूषण लोंढे आणि त्याच्या टोळीचा सहभाग उघडकीस झाला.

सातपूर पोलिसांनी या प्रकरणात तपासाची चक्रे फिरवत तातडीने तीन जणांना ताब्यात घेतले. तर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पदाधिकारी प्रकाश लोंढे यांच्यासह तीन जणांना सह आरोपी करण्यात आले असून या प्रकरणात आतापर्यंत सात जणांना सातपूर पोलिसांनी ताब्यात घेतले. लोंढे टोळी संबंधित हॉटेल चालकाकडून खंडणी वसूल करीत होती.

सूत्रधार भूषण लोंढेसह इतर संशयित फरार आहेत. सातपूर येथील माजी नगरसेवक प्रकाश लोंढे यांचा मुलगा भूषण याच्याविरुद्ध याआधीही हाणामारी, खंडणी वसुलीचे गुन्हे दाखल आहेत. पोलीस उपायुक्त काळे यांनी, लोंढे टोळीने पूर्वनियोजित कट केल्याचे सांगितले. या टोळीचा प्रमुख प्रकाश लोंढे, मुलगा दीपक उर्फ नाना लोंढे, संतोष पवार, अमोल पगारे या चार जणांना सहआरोपी करण्यात आले आहे.

जिल्हा न्यायालयातून बाहेर आणताना रिपाइंचे माजी नगरसेवक प्रकाश लोंढे , त्यांचा मुलगा दीपक लोंढे

'नाशिक जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला'

लोंढे बोलले, नाशिक जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला शहरात वाढलेली गुन्हेगारी आणि या गुन्हेगारीला मिळणारा राजकीय वरदहस्त याविरोधात पोलिसांनी आता पूर्णपणे बळाचा वापर करण्यास सुरुवात केली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे नाशिकचे पदाधिकारी प्रकाश लोंढे, त्यांचा मुलगा दीपक लोंढे व अन्य संशयितांना न्यायालयात नेताना त्यांच्याकडून पोलिसांनी नाशिक जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला असे जोरजोरात वदवून घेतले. या कारवाईचे नाशिककरांनी स्वागत केले आहे.

गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिसांचे कसून प्रयत्न

अविनाश पाटील, लोकसत्ता

नाशिक : पोलिसांनी गुन्हेगारीचा नायनाट करण्याचा निर्धार केल्यास काय होऊ शकते, हे आठवडाभरापासून नाशिक शहर अनुभवू लागले आहे. या वर्षातील हत्यांची संख्या ४५ पर्यंत पोहचली आणि सर्वसामान्य नाशिककरही ओरड करू लागल्यावर शहर पोलिसांनी दिवाळीआधीच फटाके फोडण्यास सुरुवात केली आहे. गल्लीबोळातील कोणी ऐरागेरा नव्हे तर, या शहराचे बॉस आपणच असल्याचे पोलिसांनी दाखवून दिल्याने राजकीय नेते, पुढाऱ्यांच्या छत्रछायेखाली पोसलेल्या गुन्हेगारांना खऱ्या अर्थाने धडकी भरली असेल. नाशिककर कित्येक महिन्यांपासून पोलिसांचे हे रूप पाहण्यासाठी आसुसलेले होते. उशिरा का होईना, नाशिक पोलिसांना जाग आल्याने त्यांचे स्वागतच होत आहे.

नाशिकची गुन्हेगारी ही कायमच राजकीय पाठबळामुळेच फोफावल्याचे वारंवार उघड झाले आहे. गुन्हेगार हा कायमच आपल्या बचावासाठी सत्ताधारी पक्षाशी सलगी करीत असतो. त्यामुळे साहजिकच जे सत्तेतील पक्ष असतात, त्यांच्याकडे गुन्हेगारी कारवायांशी संबंधित मंडळींचा अधिक ओढा असतो. कधी सामाजिक कार्यकर्ता, कधी नगरसेवक असे वेगवेगळे अवतार ही मंडळी धारण करीत असतात. एखाद्या लोकप्रतिनिधीचा वरदहस्त असल्यावर या मंडळींची भीड चेपते. त्याची झळ कधीकधी पोलिसांनाही बसते.

आठवड्याभरापासून पोलीस आयुक्तांनी सुरू केलेला धडाका याआधीच केला असता तर, नाशिककर त्यांना डोक्यावर घेऊन नाचले असते. याआधीही ज्यांनी ज्यांनी गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाई केली, अशांना नाशिककरांनी पाठबळच दिले आहे. मग ते नाशिकमधील शेवटचा एन्काउंटर ज्यांच्या कार्यकाळात झाला ते तत्कालीन आयुक्त विष्णुदेव मिश्रा असोत, टिप्पर गँगला सोलून काढणारे कुलवंतकुमार सरंगल असोत किंवा भूमाफियांविरुद्ध कारवाई करणारे दीपक पांडे असोत, पोलीस आयुक्तांनी कडक कारवाई करावी, हीच नागरिकांची अपेक्षा असते.

पोलीस आयुक्तांचा रौद्रावतार...

काही महिन्यांपासून नाशिक शहर गुन्हेगारीच्या आगीत होरपळत असताना पोलीस काहीच का करीत नाहीत, हा प्रश्न सर्वसामान्यांना चक्रावून सोडत होता. रस्त्यांवर लुटमार, हाणामाऱ्या, भरदिवसा गोळीबार, तलवारी, कोयते बाहेर निघत असताना या मंडळींना पोलिसांचे भय वाटत नाही का, असा प्रश्न पडणे साहजिकच. उशिरा का होईना, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी रौद्रावतार दाखविण्यास सुरुवात केली आहे. परंतु, त्यासाठी आधी शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि मनसे यांचा गुन्हेगारीविरुद्ध संयुक्त मोर्चा, शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) मंत्री दादा भुसे यांची सूचना, नंतर खुद्द भाजपच्या तिन्ही आमदारांनी भेट घेणे, याची वाट का पाहावी लागली ?

शहरातील गुन्हेगारीस सत्ताधारी जबाबदार

हर्षवर्धन सपकाळ यांचा आरोप; अंमली पदार्थांच्या 'गुजरात कनेक्शन'कडे लक्षवेध

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : नाशिक हे धार्मिक, सांस्कृतिक शहर आहे. थंड हवेचे ठिकाण आहे. अमली पदार्थांमुळे नाशिकच्या या ओळखीला गालबोट लागत आहे. गुजरातमधील बंदरांतून अमली पदार्थ येथे येतात आणि महाराष्ट्रात जातात का. असा प्रश्न करीत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी नाशिकच्या अमली पदार्थांच्या 'गुजरात कनेक्शन'कडे लक्ष वेधले. शहरातील वाढत्या गुन्हेगारीवरून त्यांनी सत्ताधाऱ्यांवर टीकास्त्र सोडले.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली येथे गुरुवारी उत्तर महाराष्ट्र विभागातील जिल्ह्यांची आढावा बैठक पार पडली. यावेळी आगामी निवडणुकी संदर्भातील रणनीती आणि त्या संदर्भातील आढावा, या बाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीला काँग्रेस कार्य समितीचे सदस्य ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, खासदार शोभा बच्छाव, अ. भा. काँग्रेस कमिटीचे सचिव बी. एम. संदीप यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. अमली पदार्थांच्या या संबंधांचा पर्दाफाश करण्याची आवश्यकता सपकाळ यांनी मांडली. नाशिकमध्ये नऊ महिन्यात ४४ खून झाले. ४५ वा लोकशाहीचा खून झाला. आपण कोणत्या राज्यात, देशात राहतो, सत्ताधाऱ्यांना तालिबान करायचा आहे का, असा प्रश्न त्यांनी केला. कायदा व सुव्यवस्था ढासळण्यास सत्ताधाऱ्यांनी सांभाळलेली पिलावळ या स्थितीला जबाबदार असल्याचा आरोप त्यांनी केला.

'हल्लेखोराचे नाव दडवण्याचा प्रयत्न'

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर सर्वोच्च न्यायालयात एका वकिलाने वस्तू (चप्पल किंवा कागदाचा गुंडाळा) फेकण्याचा प्रयत्न केला होता. या हल्ल्याचा निषेध करीत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी हल्लेखोर वकिलाचे नाव जाणीवपूर्वक दडवले जात असल्याचा आरोप केला. काही दिवसांपूर्वी डोंबिवलीतील काँग्रेसचे कार्यकर्ते मामा पगारे यांच्यांबाबत असाच घृणास्पद प्रकार घडला होता. त्याचे पुढील पाऊल सर्वोच्च न्यायालयात पहायला मिळाल्याचे सपकाळ यांनी म्हटले आहे. काँग्रेसचे डोंबिवलीतील ज्येष्ठ नेते मामा पगारे यांच्याबाबतीत घडलेल्या घृणास्पद प्रकाराचे पुढील पाऊल म्हणजे न्यायालयात घडलेली घटना असल्याचे सपकाळ यांनी सांगितले.

डीसीबी बँक लिमिटेड
(क्षेत्रीय कार्यालय: सेलो प्लॅटीना, कार्यालय क्र. ३०२, तिसरा मजला, एफसी रोड, पोलीस ग्राउंड जवळ, ललित महाल हॉटेल समोर, शिवाजी नगर पुणे ४११००५)
(कॉर्पोरेट आणि नोंदणीकृत कार्यालय: ६ वा मजला, टॉवर ए, पेनिनस्युला बिजनेस पार्क, सेनापती बापट मार्ग, लोवर परेल, मुंबई – ४०००१३)

DCB BANK

ई-लिलाव सूचना
(सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट), नियमावली, २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८ (६) वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अ‍ॅसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री

सूचना ह्याद्वारे सर्व जनतेला आणि विशेषत: कर्जदारा (रां), सह- कर्जदारांना आणि विशेषत: हमीदाराना ह्याद्वारे प्राधिकृत अधिकारी ह्यांच्याद्वारे देण्यात येत आहे की खाली नमूद मालमत्ता डीसीबी बँक लि. कडे गहाण ठेवण्यात आली होती ज्याचा बँकेच्या प्राधिकृत अधिकारी ह्यांच्याद्वारे सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अ‍ॅसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ च्या तरतुदीच्या अंतर्गत प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. मालमत्तांची खाली देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार खाली नमूद देणी आणि त्यावरील व्याज, किंमत आणि शुल्क इत्यादीचं वसुलीसाठी निविदा वजा ई – लिलावाद्वारे विक्री करण्यात येणार आहे. मालमत्तांची विक्री "जे आहे जेथे आहे" आणि "जे आहे जसे आहे" तत्वावर करण्यात येईल.

कर्जदाराचे नाव आणि कर्ज खाते क्र.	राखीव मूल्य इसारा रक्कम	ठेव (इरठे)	बोली वाढ रक्कम	०६-१०-२०२५ अनुसार एफसीएल	ई-लिलावाचा दिनांक	ताब्याचा प्रकार
वर्षा अनिल खैरनार (एचएचओएचएमएनएएस०००४४८१३)	रु. ४,०५,०००/-	रु. ४५,०००/-	रु. १,०००/-	रु. ८,९२,९०३/-	३०-१०-२०२५ आणि दु. ३ वा – सायं. ४ वा.	प्रत्यक्ष
मालमत्तेचा तपशिल: तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक च्या हद्दीमधील जालुके दिंडोरी ग्रामपंचायत येथे वसलेल्या १९७.५० चौ. मी. च्या प्लॉट क्र. २१, सर्वे क्र. ५५/१/१/२वरील "साई स्पर्श" म्हणून ज्ञात असलेल्या आरसीसीचे बांधकाम असलेल्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील ३४.३८ चौ.मी. म्हणजेच ३७०.०० चौ. फू. क्षेत्रफळ असलेल्या सदनिका क्र. ३०७ चा सर्व खंड आणि भूखंड. सीमा पुढील प्रमाणे : पूर्वेस किंवा त्या दिशेने: सदनिका क्र. ६, पश्चिमेस किंवा त्या दिशेने: मार्जिन जागा आणि सदनिका क्र. २२, दक्षिणेस किंवा त्या दिशेने: प्लॉट क्र. ७ आणि खुली जागा, उत्तरेस किंवा त्या दिशेने: जीना आणि सदनिका क्र. ८ (सुरक्षित मत्ता)						
रोहित दिलीप परदेश (डीआरएचएलएनएएस००५६३५६७)	रु. २४,५०,०००/-	रु. २,४५,०००/-	रु. १,०००/-	रु. २५,६३,२२४/-	३०-१०-२०२५ आणि दु. ३ वा – सायं. ४ वा.	प्रत्यक्ष
मालमत्तेचा तपशिल: गाव चुंचले, ता. आणि जिल्हा नाशिक येथे वसलेल्या लिग स्कीमच्या अंतर्गत धारण केलेला प्लॉट क्र. १७, महाराष्ट्र हाऊसिंग अँड एरिया डेवलपमेंट अथोरीटी (म्हाडा) म्हणून ज्ञात असलेल्या योजनेमधील मालमत्तेच्या धारण केलेल्या सर्वे क्र. १०५/२ चा सर्व खंड आणि भूखंडावर बांधण्यात आलेल्या १८.०० चौ. मी. मोजमापाचा तळ मजला आणि १२.०० चौ.मी. मोजमापाचा पहिला मजला म्हणजेच एकूण बिल्टअप क्षेत्रफळ ३०.०० चौ.मी. सीमा पुढीलप्रमाणे: पूर्व: प्लॉट क्र. ०६, पश्चिम: ४.५० मी. कॉलनी रोड, दक्षिण: प्लॉट क्र. १८, उत्तर: प्लॉट क्र. १६ (सुरक्षित मत्ता)						

इरठेच्या सादरीकरणासाठी दिनांक आणि वेळ किंवा त्यापूर्वी – २९-१०-२०२५ रोजी १२:०० वा. पर्यंत सहभागी होण्यासाठी विनंतीपत्रासह, केव्हायसी, पन कार्ड, इरठेच्या पुराव्यासह ई-मेल आयडी वर पाठवावे: kalpesh.verma@dcbbank.com/ आणि hemant.komdarkar@dcbbank.com

पाहणीचा दिनांक आणि वेळ : सर्व मालमत्तांसाठी: १४-१०-२०२५ ते १७-१०-२०२५ दरम्यान स. १० वा. ते सायं. ५ वा. पर्यंत. कल्पेश वर्मा, मोबाईल ८६६८३८२०५१, श्री. हेमंत कोमदरकर, मोबा: ९८२३०४९९१२; सतीश वाडजे ९१७५४४८७३९ ह्यांच्याशी स. ११ वा. ते सायं. ६ वा. दरम्यान.

इच्छुक खरेदीदार/ बोलीदारांनी इरठेच्या रकमेचा भरणा केवळ डीसीबी बँक लि. च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे करावा.

ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती
१) मालमत्ता "जसे आहे तिथे आहे", "जसे आहे जे आहे", "जसे आहे कसे आहे" आणि "नो रिकव्हर" या तत्त्वावर कोणत्याही प्रकारच्या वॉरंटी आणि नुकसानभरपाईशिवाय विकल्या जात आहेत.
२) सर्व वैधानिक देणी/अटेंडंट शुल्क/नोंदणी शुल्क, मुद्रांक शुल्क, कर इत्यादींसह इतर देणी खरेदीदाराने भरावी लागतील आणि बँकेला माहिती नसलेल्या ई-लिलाव मालमत्तेच्या संदर्भात सरकार किंवा इतर कोणाचेही कोणतेही शुल्क, धारणाधिकार किंवा इतर कोणत्याही देणींसाठी अधिकृत अधिकारी किंवा बँक जबाबदार राहणार नाही. बोलीदाराला वैधानिक देणी, मालमत्ता कराचे क्षेत्रीय अधिकारी, वीज देणी इत्यादींसह मालमत्तेवरील देणींबद्दल स्वत:ची स्वतंत्र चौकशी करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.
३) (वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे तारखांना टी.जया प्रकाश रेड्डी, मोबाईल क्रमांक: ८१४२०००००६४: बँक एंड ऑफिस: ८१४२००००६६/६३/६२, ऑफिस मेल आयडी: info@bankauctions.in आणि मेल आयडी: prakash@Bankauctions.in यांच्याशी त्यांच्या वेब पोर्टल https://bankauctions.in/ वर संपर्क साधा. अमर्यादित विस्तारासह ५ मिनिटे. बोलीदारांना त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्तींची सविस्तर माहिती https://www.dcbbank.com/cms/showpage/page/customer-corner या लिंकवर द्यावी.
४) इच्छुक बोलीदारांनी पोर्टलवर स्वत:ची नोंदणी करणे आणि लॉगिन आयडी आणि पासवर्ड आगाऊ घेणे आवश्यक आहे, जे ई-बिडिंगसाठी अनिवार्य आहे, लिलाव सेवा प्रदात्याकडून (४क्लोजर.कॉम), मोबाईल क्रमांक: ८१४२००००६४, बँक एंड ऑफिस: ८१४२००००६६/६३/६२, संभाव्य बोलीदार त्यांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावरूनच ई-लिलावावर ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात.
५) वेबसाइटवर ऑफर/निविदा कागदपत्रांसह उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यात अर्ज करून लिलाव प्रक्रियेत ऑनलाइन ई-लिलावात सहभागी होणे अनिवार्य आहे.
"सदर नोटिसीमध्ये नमूद केलेल्या सर्व मजकुराबाबतच्या अधिक स्पष्टते साठी इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध केलेली नोटीस ग्राह्य धरण्यात येईल"

दिनांक: १०-१०-२०२५
ठिकाण: नाशिक
सही/- प्राधिकृत अधिकारी
डीसीबी बँक लिमिटेड

उत्तर महाराष्ट्र भाजपची आज बैठक

देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत येथे नुकताच शिवसेनेची बूथ प्रमुख आणि कार्यकर्ता, पदाधिकारी यांचा मेळावा पार पडला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, तयारीला वेग देत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या निवडणुका महायुती म्हणून लढण्याचे जाहीर केले. त्यांच्या पाठोपाठ आता शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत येथे भाजप उत्तर महाराष्ट्राची बैठक होणार आहे.

नाशिक महानगरपालिकेसह अनेक ठिकाणी स्वबळावर लढण्याची भाजपने तयारी केली आहे. त्यामुळे या निवडणुकीत मित्रपक्षांना बरोबर घेतले जाईल की नाही, हा प्रश्न अनुत्तरीत आहे. रविवारी शिंदे गटाच्या बूथ प्रमुख कार्यशाळा आणि कार्यकर्ता, पदाधिकारी मेळाव्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नेहमीप्रमाणे उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका करण्यासह आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकण्यासाठी काय करावयास हवे, याविषयी मार्गदर्शन केले होते. निवडणुका कशा जिंकायच्या हे आम्हांला माहिती आहे. पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी निवडणुका जिंकण्यासाठी मतदार याद्यांवर लक्ष केंद्रित करा, असा कानमंत्र त्यांनी दिला.

स्थानिक स्वराज्य संस्थांवर एकहाती वर्चस्व मिळवण्यासाठी भाजपकडून जोरदार तयारी सुरू आहे. यामुळे शिंदे गटाची कोंडी झाली आहे.

एकहाती सत्तेसाठी भाजप प्रयत्नशील

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी उत्तर महाराष्ट्रातील भाजपचे मंत्री, आमदार, खासदार आणि जिल्हानिहाय प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहतील. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या निवडणुका महायुतीत लढण्याच्या केलेल्या घोषणेला भाजपकडून कसा प्रतिसाद मिळतो, याबद्दल राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. कारण, नाशिक महापालिकेसह अनेक ठिकाणी भाजपने एकहाती वर्चस्व राखण्याची तयारी केली आहे.

कविवर्य नारायण सुर्वे यांच्या स्वप्नातील वाचनालयाची वाट खडतर

जागा मिळून आठ वर्षे झाली तरीही प्रकल्प कागदावरच

चारूशीला कुलकर्णी, लोकसत्ता

नाशिक : कविवर्य नारायण सुर्वे यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे होत असताना त्यांचे स्वप्नातील वाचनालय 'माझे विद्यापीठ'चा प्रवास दिवसागणिक खडतर होत चालला आहे. शहरातील मायको फोरम येथील लहानशा जागेत सध्या कविवर्य नारायण सुर्वे वाचनालय आहे. वाचनालयाच्या पदाधिकाऱ्यांकडून यंदा नवीन जागेत वाचनालयाच्या कामाला सुरुवात होणार असा दावा करण्यात येत आहे.

कविवर्य नारायण सुर्वे यांनी आपल्या लेखणीतून अस्वस्थ मनाची स्पंदने टिपत असतांना वंचिताच्या प्रश्नांवर आवाज उठवला. त्यांच्या अमूल्य अशा साहित्य संपदेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कविवर्य नारायण सुर्वे वाचनालयास सध्या वेगवेगळ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. यामुळे महापालिकेकडून खुटवडनगर परिसरात जागा मंजूर होऊन आठ वर्षांचा कालावधी लोटला तरी त्या जागेवर अद्याप वाचनालय उभारणीचे काम सुरू होऊ शकलेले नाही. परिणामी, सुर्वे यांच्या स्वप्नातील 'माझे विद्यापीठ' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा प्रवास खडतर झाला आहे. यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, संस्थांनी सहकार्य करावे, असे आवाहन वाचनालयाच्या वतीने करण्यात येत आहे.

कामगारबहुल सिडको वसाहत परिसरात मायको फोरमने सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांची आखणी केली. या उपक्रमांशी नारायण सुर्वे यांची नाळ जुळली. फोरमने वाचन संस्कृतीसाठी वाचनालय सुरू करण्याचे ठरवले. यासाठी जागा ठरली ती सिंहस्थ नगरमधील मायको फोरममधील काही भाग. १९९८ मध्ये सुर्वे यांच्या सहकार्याने वाचनालय सुरू झाले. वाचनालयाचे उद्घाटन सुर्वे यांच्या हस्ते झाले. वाचनालयास मिळणारा प्रतिसाद पाहता सुर्वे यांनी आपली साहित्यसंपदा, त्यांना मिळालेले पुरस्कार वाचनालयाला सुपूर्द केले. पुरस्काराचा हा ठेवा २००७ मध्ये कला दालनाच्या माध्यमातून खुला झाला. या काळात सुर्वे यांचे वास्तव्य नाशिकमध्ये होते. नंतर ते मूळगावी परतले. दरम्यान, वाचनालयाने सुर्वे यांच्या पश्चात त्यांच्या स्मृतींची जपवणूक व्हावी यासाठी महापालिकेकडे जागा मागितली.

सुर्वेप्रेमींमध्ये नाराजी

नाशिक येथे मायको फोरमच्या जागेत कविवर्य नारायण सुर्वे वाचनालय आहे. सुर्वे यांनी 'माझे विद्यापीठ' असे भव्य वाचनालय असावे, असे स्वप्न पाहिले होते. असे वाचनालय उभारणीसाठी जागा मिळून आठ वर्षांचा कालावधी उलटूनही त्या जागेवर काम सुरू झालेले नाही. त्यामुळे सुर्वेप्रेमींमध्ये आणि साहित्यप्रेमींमध्ये नाराजी आहे.

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट-IV-ए – स्थावर मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना
सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८(६) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव-विक्री सूचना
नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंतरिक्ष भवन, २२ कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११०००१, फोन्स : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com

शाखा कार्यालय नाशिक : ऑफिस नं. ४०७ व ४०८, ४था मजला, पद्मा विश्व लँडमार्क, तनिष्क शोरुम जवळ, अ‍ॅक्सिस बँकेच्या वरती, राक्का कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक-४२२००२.

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून रकाना नं. "ए" मध्ये दर्शविलेल्या ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या/ ताब्यात असलेल्या याखालील रकाना नं. "डी" मध्ये वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक / प्रत्यक्ष ताबा (रकाना नं. "सी"मध्ये वर्णिल्यानुसार)"मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"/ सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारीद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या तपशीलानुसार "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" आणि "जे काही आहे तेथे आहे" या तत्त्वावर करण्यात येणार आहे. ऋणको/ गहाणकार/ विधि वारसदार, विधि प्रतिनिधी (जे ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत), तारखेनुसार सुधारित केल्याप्रमाणे सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या रुल ८(६) व ९ अंतर्गत रकाना नं. "ए" मध्ये दर्शविल्यानुसार, जसे असेल त्यानुसार, संबंधित ऋणको/ गहाणकारांचे (दिवंगत असल्यामुळे) निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना याद्वारा सूचना देण्यात आली आहे. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या www.pnbhousing.com या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

लोन नं./ ऋणको/ सह-ऋणको/ हमीदार/ विधि वारसदाराचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व तारीख (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी)	राखीव किंमत (आरपी) (ई)	इरठे (आरपीची १०%) (एफ)	बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीची तारीख व वेळ (आय)	लिलावाची तारीख व वेळ (जे)	ज्ञात भार/ न्यायालयीन प्रकरण, जर असल्यास (के)
HOU/NSK/ 0821/904469 दिपक राजू अहिरे/ अल्का दिपक अहिरे – शाखा कार्यालय : नाशिक	रु. १४३४२८५.२८ व ०७.०२.२०२४ रोजीप्रमाणे	प्रत्यक्ष ताबा	सिंगल बिल्डिंग, तिसरा मजला, फ्लॅट नं. १६, सनशाईन अपार्टमेंट, प्लॉट नं. १५ व १६, सर्व्हे नं. १२३ / ए / २, सीटीएस नं. ४१४६ व ४१४५, सातपूर गंगापूर रोड, भोर टॉवर जवळ, शिवाजी नगर, व्हिलेज गंगापूर शिवार, नाशिक-४२२००७, महाराष्ट्र, भारत.	रु. १६४८०००/-	रु. १६४८००/-	१३.११.२०२५	रु. १०,०००/-	१८.१०.२०२५ रोजी दु. १२:०० व दु. ०४:०० दरम्यान	१४.११.२०२५ रोजी दु. ०२.०० व दु. ०३:०० दरम्यान	ज्ञात नाही

* त्याकरिता वसुली आणि/ किंवा प्रदानाच्या तारखेपर्यंत निघालेले लागू असलेल्याप्रमाणे १८% प्र.व. दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, किंमत, आकार, इ. सह एकत्रित. ** "पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"च्या प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीच्या अनुसार रकाना क्र. "के" मध्ये जे काही प्रकट केले आहे ते वगळता वर नमूद केलेल्या स्थावर/ सुरक्षित मत्तेवर तेथे कोणतेही भार/ दावे नाहीत. याआधिक, सदर भार यशस्वी खरीददार/ बोलीदाराद्वारा, त्याच्या/ तिच्याकडील, सोसावयाचे आहेत/ प्रदान करावयाचे आहेत. भावी खरीददार/ बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी स्थावर मालमत्तेवरील नमूद केलेल्या भाराची स्वतंत्ररीत्या पडताळणी करून निश्चित करावेत. (१.) आजच्या तारखेनुसार, तेथे वरील स्थावर मालमत्ता / सुरक्षित मत्तेची विक्री करणे, अभिहस्तांतरण आणि/ किंवा वासलात लावणे यापासून "पीएनबीएचएफएल"ला / "पीएनबीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारींना प्रतिबंध करण्यास कोणताही आदेश आणि / किंवा निषेधाज्ञा आलेली नाही. (२.) भावी खरीददार / बोलीदार आणि स्वारस्य असलेले पक्षकार रकाना नं. "के" मध्ये नमूद केलेल्या व मंजूर केलेल्या प्रक्रिया / आदेश, इ., जर असल्यास, त्यामधील याचिकाकर्त्यांबाबत तपासणी स्वत: स्वतंत्रपणे करू शकतील. समाविष्ट परंतु त्याकरिता "पीएनबीएचएफएल"कडे उपलब्ध असलेल्या संबंधित नामाधिकाराच्या कागदपत्रांचे नामाधिकार मर्यादित नाहीत आणि निविदा/ बोली अर्ज प्रपत्र किंवा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत स्वत:चे समाधान करून घ्यावे. बोलीदाराने बोली प्रपत्रासमवेत या लिलावाच्या शर्ती व अटी स्वाक्षरीकृत करून घ्यावयाच्या आहेत.(३.) कृपया नोंद घ्यावी की, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(३)च्या अनुसार, बोलीदार / खरीददाराने त्याच दिवशी किंवा उशिरात उशिरा कामाच्या पुढील दिवशी विक्री किंमतीच्या (इसारा रक्कम समाविष्ट, जर भरलेली असल्यास) २५% ठेव, कायदेशीररीत्या बांधील असलेली, भरावयाची आहे. विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(२) च्या अनुसार सुरक्षित धनकोद्वारा विक्री किंमतीच्या २५% रकमेच्या स्वीकृतीनंतरच केवळ बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री विचाराधीन उर्वरित रकमेच्या ७५% विक्री निश्चितीकरण पत्राच्या अभिस्वीकृतीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत खरीददाराद्वारा भरावयाची आहे आणि सदर ठेव भरण्यात कसूर झाल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्री निश्चितीकरण पत्रात नमूद केलेल्या १५ दिवसांचा अनिवार्य कालावधी संपण्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत विक्री निश्चितीकरण रकमेचा भागश: प्रदान जप्त करतील आणि मालमत्ता / सुरक्षित मत्ता सरफेसी अ‍ॅक्टच्या तरतुदींच्या अनुसार पुन्हा विक्रीकरिता ठेवण्यात येईल.(४.) "सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड" ई-लिलावाद्वारा विक्रीच्या आयोजनात प्राधिकृत अधिकारीस सहाय्य करणार आहे. तिचे कॉर्पोरेट कार्यालय येथे असलेले – प्लॉट नं. ६८, तिसरा मजला, सेक्टर ४४, गुरगाव, हरयाणा-१२२००३ वेबसाइट – www.bankeauctions.com बोली कागदपत्रे प्राप्त करणे किंवा मालमत्तेच्या पाहणीसंबंधित कोणत्याही सहाय्याकरिता आणि कोणत्याही अन्य शंकांकरिता किंवा नोंदणीकरिता तुम्हास गणेश अंकुश/ निलाक्षी पाटील टोल-फ्रि नं. : १८०० १२० ८८००, ईमेल : auction@pnbhousing.com जी "पीएनबीएचएफएल"ची अधिकृत व्यक्ती आहे, यांच्याशी समन्वय साधावयाचा आहे किंवा www.pnbhousing.com या वेबसाइटला भेट द्यावी.

स्थळ : नाशिक, दिनांक : १०.१०.२०२५
स्वाक्षरी/-प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

गुजरातच्या कंपनीविरोधात वाळू चोरीचा गुन्हा

लोकसत्ता वार्ताहर

मालेगाव : शहरातील ५०० कोटींचे भुयारी गटाराचे काम करणाऱ्या गुजरातच्या अंकिता कन्स्ट्रक्शन या कंपनी विरोधात येथील महसूल व पोलीस खात्याच्या संयुक्त पथकाने केलेल्या कारवाईनंतर वाळू चोरीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काही दिवसांपासून शहर व तालुका परिसरात गौण खनिजांचे अवैध उत्खनन व वाहतूक हा मुद्दा ऐरणीवर आला आहे. म्हाळदे शिवारातील ११ हजार घरकुल योजनेच्या जागेत अवैध उत्खनन झाल्याने तेथे मोठे खड्डे पडले आहेत. या अवैध उत्खननाबद्दल महसूल प्रशासनाने महापालिकेला जबाबदार धरले आहे. तसेच त्याबद्दल पाच कोटी ४७ लाखांचा दंड का आकारण्यात येऊ नये, अशी नोटीस बजावली. दुसरीकडे, बाजूला गौण खनिजांचे अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या माफियांना महसूल प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा आणि राजकीय आशीर्वाद मिळत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर मालेगावच्या अपर तहसीलदार ज्योती देवरे यांच्या नेतृत्वाखालील महसूल व पोलीस खात्याच्या संयुक्त पथकांनी अवैध पद्धतीने गौण खनिजांची वाहतूक करणाऱ्या वाहनांविरोधात कारवाई केली. या कारवाईत मुंबई-आग्रा महामार्गावर अंबिका हॉटेलजवळ एका ट्रॅक्टरमधून वाळूची वाहतूक होत असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. ट्रॅक्टर चालकाकडे विचारणा केल्यावर शहरात भुयारी गटाराचे काम करणाऱ्या अंकिता कन्स्ट्रक्शन या कंपनीच्या कामासाठी या वाळूची वाहतूक होत असल्याचे सांगण्यात आले. चालकाकडे वाळू वाहतुकीचा कोणताही परवाना आढळून आला नाही. त्यामुळे वाळूची चोरी होत असल्याचा ठपका ठेवत कंपनीचे मालक व चालकाच्या विरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच वाळूसह ट्रॅक्टर जप्त करण्यात आले.